



दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे






•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १९६ •बुधवार,दि.१५ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# केजमध्ये कोरडेवाडीच्या ग्रामस्थांचा साडेचार तास रास्ता रोको



## दोघांचा आत्मदहनाचा प्रयत्न

## पाच बसवर दगडफेक : पाच प्रवाशी जखमी







**केज । प्रतिनिधी**

कोरडेवाडी येथील साठवण तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची मदत व संपूर्ण कर्जमाफी करावी, ज्ञानराधा बँकेच्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत देण्यात यावा या मागण्यांसाठी आक्रमक झालेल्या ग्राम स्थांनी मंगळवारी (दि. १४) दुपारी १२ वाजता मोर्चा काढून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तब्बल साडेचार तास रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनात बाळराजे आवरेंनी पेट्रोल अंगावर ओतून तर स्वप्नील वरपेंनी विषारी औषध प्राशन करीत आत्मदहनाचा प्रयत्न केला. तर अज्ञातांनी बसवर दगडफेक केल्याने पाच बसचे काचा फुटून नुकसान झाले. तर बसमधील चालक, वाहकांसह पाच प्रवाशी जखमी झाले. छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्री उमरे यांनी मागील बारा दिवसांपासून या मागण्यासाठी उपोषण सुरू केले असताना शासनाकडून मागण्यासंदर्भात दखल घेतली नसल्यावरून ८ ऑक्टोबर रोजी संतप्त आंदोलकांनी शासकीय विश्रामगृह येथून बैलगाडी मोर्चा काढून

▶▶ उर्वरित पान २ वर

**● दरम्यान, शहरात आलेली वाहने रास्ता रोकोमुळे रस्त्यावर थांबून राहिल्याने दूरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तर अंबाजोगाई, बीड, पुणे, कळंब, धारूर रस्त्यावरील वाहतूक चार तास ठप्प राहिल्याने प्रवाशी नागरिक – महिला अडकून पडले होते. तर प्रवाशांची उपासमार झाली. जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा ; आंदोलक तहसीलमध्ये ठाण मांडून उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी आंदोलकांना रास्ता रोको मागे घ्यायला लावून तहसील कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांशी बोलणे करून दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारी राज्यांच्या सचिवांशी चर्चा घडवून देण्याचे आश्वासन दिले. मात्र आताच तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र द्यावे, असा आग्रह धरीत तहसील कार्यालयात आंदोलक ठाण मांडून होते**

# केजमध्ये टपरी चालकास तलवारीने मारहाण

## हातात तलवारी घेऊन शहरात दहशत निर्माण केली



**केज । प्रतिनिधी**

शहरामध्ये रात्री एका टपरी चालकासोबत वाद निर्माण झाल्याने या वादाचे पर्यावसन भांडणामध्ये झाले. टपरी चालकास सात ते आठ जणांनी तलवारीने मारहाण करूनगंभीररित्या जखमी केल्याचीघटना रात्री साडेआठच्या सुमारासघडली. जखमी तरुणास अंबाजोगाई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मारहाण करणारे हातात तलवारी आणि दांडे घेऊन आले होते, त्यामुळे शहरात रात्री दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. केज बसस्थानकासमोर असलेल्या सय्यद ईरशाद अली या टपरी चालकाचे व रणसिंग गोके याच्यात गुटखा देण्या-घेण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादाचे पर्यावसन तुंबळ हाणामारीत झाले. गोके याने आपल्या अन्य साथीदारांना आणून सय्यद ईरशाद अली याच्यावर तलवारीने वार करून गंभीररित्या जखमी करण्यात आले. सदरील जखमी तरुणास अंबाजोगाई रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मारहाण करणारे हातात तलवारी, दांडे घेऊन मोटारसायकलवर आल्याने बसस्थानक परिसरात दहशतीचे

▶▶ उर्वरित पान २ वर

# कापुस उत्पादक शेतकऱ्यांना बागायती वर्गवारी नुसार मिळणार नुकसान भरपाई



## आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या पाठपुराव्यास यश

**गेवराई । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आता ८,५०० रुपये ऐवजी हंगामी बागायती वर्गवारीनुसार प्रति हेक्टरी १७,००० रुपये प्रमाणे नुकसान भरपाई मिळणार आहे. त्याच बरोबर रब्बी हंगामात खत बी बियाणे खरेदी साठी प्रति हेक्टरी १०,००० रुपये अनुदान शासन देणार आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आता २७, ००० रुपये अर्थसहाय्य मिळणार आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांनी या कामी पुढाकार घेऊन थेट मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून कापुस उत्पादक शेतकऱ्यांना मदती बाबतचा निर्णय घेतला आहे. आ. विजयसिंह पंडित यांच्यासह बीड जिल्ह्यातील सर्व आमदारांनी या कामी एकजुटीने पाठपुरावा केल्यामुळे अखेर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे. महायुतीच्या सरकारने तात्काळ घेतलेल्या या निर्णयामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी सरकारचे आभार मानले आहेत. बीड जिल्हा तसेच गेवराई तालुक्यात अतिवृष्टी आणि गोदावरी व

▶▶ उर्वरित पान २ वर

# रमेश आडसकर यांना जिल्हापरिषदेत धोक्याची घंटा

**युसुफवडगाव सोडल तर केज, धारूर, अंबाजोगाई कुठेच विश्वासाचा गट नाही. काँग्रेस कडून राहूल सोनवणे, शरद पवार गटाकडून सौरव सोनवणे व अजित पवार गटाकडून ऋषिकेश आडसकर लढत होईल ?**



**बीड । प्रतिनिधी**

रमेश आडसकर यांना किंवा त्यांचे पुतणे ऋषिकेश आडसकर यांना युसुफवडगाव सोडल तर केज, धारूर, अंबाजोगाई या तिन्ही तालुक्यातून कोठूनच जिल्हा परिषदेत जाण्या साठी मार्ग राहिला नाही. कधी काळी केज धारूर अंबाजोगाई तालुक्यातून वर्चस्व असलेले कुटूंब आज विस्थापित होत चालय केज तर त्यांचा बालेकिल्ला होता पण ते ही बेचिराख झाला आहे. आज कुठल्या गटातून लढाव... लढाव तर जिल्हा परिषद गटच नाही अशी परिस्थीती झाली आहे. स्वतःचा आडस हा गट व गण दोन्ही ओबीसी साठी सुटल्याने आता आडसकर कुठला पर्याय निवडतात हे लवकरच कळेल. कधी काळी आमदार निवडून

▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतीच्या वादातून पुतण्याच्या मारहाणीत चुलत्याचा मृत्यु



**बीड । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील लोणी सय्यदमीर येथे शेतीच्या वादातून तीन पुतण्यांसह तीन सुना, अशा सहा जणांनी कोयता, लोखंडी पाइपने केलेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या छबू देवकर वय (७२) या चुलत्याचा अहिल्यानगर येथील रुग्णालयात रविवारी मृत्यु झाला. ही घटना शनिवार (दि.११) रोजी संध्याकाळी ०६:३० च्या सुमारास घडली. आष्टी तालुक्यातील लोणी सय्यदमीर येथील देवकर कुटुंबामध्ये अनेक दिवसांपासून शेतातील बांध व पाइपलाइनच्या कारणावरून धुसफूस सुरू होती. शनिवार (दि.११)रोजी संध्याकाळी ०६:३० वाजता लहान मुले चेंडू खेळत असताना झालेल्या भांडणाचे रूपांतर हाणामारीत होऊन तीन पुतणे व सुना अशा सहा जणांनी मिळून कोयता, लोखंडी पाइपने केलेल्या मारहाणीत छबू देवकर, वय ७२ हे गंभीर जखमी झाले. वादामध्ये पडलेला छबू देवकर यांचा मुलगा मिठू देवकर हाही जखमी झाला आहे. दरम्यान, हाणामारीत गंभीर जखमी झालेले छबू देवकर यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आल्यांनतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सहा जणांना गावातून घेतले ताब्यात अंभोरा ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाची चक्रे फिरवली. दोन पथके तयार करत आरोपीच्या शोधासाठी पाठवली.

▶ उर्वरित पान २ वर

## फरारी आरोपींना अटक

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार पोलीस ठाणे अंतर्गत गुन्हा रजिस्टर क्र. १७८/२०२३ कलम ३७९ भा.दं. वि. या गुन्ह्यातील दोन पाहिजे आरोपी १ कृष्णा नवनाथ माळी २ अशोक वैजनाथ माळी हे दोन्ही आरोपी मागील दोन वषारपासून फरार होते. पोलीस पथकाने आरोपींच्या मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करून त्यांचा माग काढला असता, ते घोसापुरी, ता. व जि. बीड येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार आज दिनांक १३.१०.२०२५ रोजी शिरूर कासार पोलीस पथकाने दक्षतेने छापा टाकून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर

▶▶ उर्वरित पान २ वर

## दु:खद घटना ; पवन थिगळे यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील सेवानिवृत्त कर्मचारी दिलिपराव ( दामु) थिगळे यांचे चिरंजीव पवनकुमार थिगळे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले त्याचा अत्यंसंस्कार दि. १४ अक्टोबंर मंगळवार रोजी

▶▶ उर्वरित पान २ वर






# पालकमंत्री अजित पवारांना आ.संदीप क्षीरसागरांकडून अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर



## • मतदार संघातील विविध मागण्यांचे दिले पत्र

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपूर्वी बीड मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्री मा.अजित पवार यांना आ.संदीप क्षीरसागरांनी भेट घेऊन अहवाल सादर केला. आ.संदीप क्षीरसागर यांनी दि.१४ (मंगळवार) रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेत अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर करत विविध मागण्यांचे पत्र दिले. यामध्ये भूस्खलनाच्या धोक्यामुळे कपिलधारवाडी येथे माळीण गावासारखी दुर्घटना होण्याची शक्यता असून या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी केली. तसेच अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झालेल्या आणि पुढील काळात देखील संभाव्य धोका असलेल्या हिंगणी खुर्द गावाचे स्थलांतर करण्याची मागणी देखील आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.याव्यतिरिक्त बीड मतदार संघातील रस्ते व पूल वाहून गेल्यामुळे नागरिकांना ये जा करण्यास मोठी अडचण येत आहे. अनेक गावांचे संपर्क तुटल्याने हे रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करण्यात यावे तसेच काही ठिकाणी नवीन रस्ते आणि पूल करण्यात यावे.




# पांढरी काठी : दृष्टिहीनांच्या आत्मविश्वासाचा प्रकाशमार्ग

जगात डोळे हे ज्ञानाचे, अनुभूतीचे आणि ओळखीसाठीचे सर्वात सामर्थ्यवान माध्यम मानले जाते. परंतु या डोळ्यांशिवायही अनेक व्यक्ती जग पाहतात ते मनाच्या डोळ्यांनी, संवेदनांच्या माध्यमातून, अनुभवाच्या प्रकाशातून. या अशा दृष्टिहीन व्यक्तींच्या स्वावलंबनाचे, सन्मानाचे आणि सामाजिक समानतेच्या अधिकाराचे प्रतीक म्हणजे पांढरी काठी (White Cane) होय. म्हणूनच दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक पांढरी काठी दिन' (World White Cane Day) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ दृष्टिहीनांच्या सन्मानाचा नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या स्वातंत्र्यपूर्ण जीवनाचा आदर करावा, याची आठवण करून देणारा आहे. पांढऱ्या काठीचा इतिहास विसाव्या शतकाच्या आरंभीचा आहे. १९२१ मध्ये, इंग्लंडमधील ब्रिस्टॉल शहरातील छायाचित्रकार जेम्स बिग्स यांनी अपघातामुळे दृष्टी गमावली आणि रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्यासाठी आपल्या चालण्याच्या काठीला पांढरे रंग लावले, ज्यामुळे ती वाहनचालकांना दिसू शकली. १९३१ मध्ये, फ्रान्समधील गिल्ली द'हर्बेमाँट यांनी पांढऱ्या काठीचा वापर दृष्टिहीनांसाठी सुरू केला. १९३१ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या एका समारंभात त्यांनी दोन पांढऱ्या काठी दृष्टिहीनांना दिल्या, ज्यात एक अंध सैनिक आणि एक अंध नागरीक होते. यानंतर ५,००० पांढऱ्या काठी फ्रान्समधील अंध सैनिक आणि नागरिकांना वितरित करण्यात



आल्या. या घटनांमुळे पांढरी काठी दृष्टिहीनांसाठी एक महत्त्वपूर्ण चिन्ह बनली, ज्यामुळे त्यांची सुरक्षितता आणि स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यात मदत झाली. या काठीचा रंग पांढरा ठरविण्यामागे एक समाजशास्त्रीय विचार होता तो म्हणजे पांढरा रंग म्हणजे प्रकाश, शांती, सन्मान आणि दृष्टीचे प्रतीक होय. हा रंग इतर वाहनचालकांना किंवा नागरिकांना दृष्टिहीन व्यक्ती असल्याची ओळख देतो. १९६४ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांनी अधिकृतरीत्या १५ ऑक्टोबर हा 'White Cane Safety Day' म्हणून जाहीर केला. पुढे तो दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर World White Cane Day म्हणून साजरा होऊ लागला. आज या दिवशी जगभरातील संस्था, सरकारे आणि स्वयंसेवी संघटना दृष्टिहीनांच्या स्वावलंबनासाठी कार्य करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करतात.

पांढरी काठी ही केवळ चालण्याचे साधन नाही, ती स्वाभिमानाचे प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला आपल्या आजूबाजूच्या वातावरणाची जाणीव करून देणारी ही काठी त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. काठीच्या साहाय्याने ते रस्त्यांवर सुरक्षितपणे चालू शकतात, अडथळे ओळखू शकतात, दिशांचा अंदाज घेऊ शकतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर पांढरी काठी ही 'स्वावलंबनाचे' आणि 'समानतेचे' प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला मदतीवर अवलंबून राहावे लागत नाही, तर तो स्वतःच्या सामर्थ्याने समाजात मुक्तपणे वावरतो. हीच खरी 'दृष्टी' आहे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची, स्वातंत्र्याची आणि मानवी प्रतिष्ठेची. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार, जगभरात सुमारे २८५ दशलक्ष लोक काही ना काही प्रकारच्या दृक्दोषाने ग्रस्त आहेत, त्यापैकी अनेक लोक पूर्णतः दृष्टिहीन आहेत. भारतातही दृक्दोषाचे प्रमाण चिंताजनक असून, अनेक लाख लोक विविध प्रकारच्या दृष्टिदोषाने प्रभावित आहेत. या परिस्थितीवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्था नेत्रदान, मोफत शस्त्रक्रिया, शिक्षण व रोजगार यासारख्या उपक्रमांद्वारे उपाययोजना करत आहेत. ग्रामीण भारतात अंधत्वाचे प्रमाण अधिक आहे, कारण आरोग्य सुविधा, जागरूकता आणि नेत्रोपचार या क्षेत्रांमध्ये अजूनही मोठी दरी आहे. राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रम (NPCB) अंतर्गत भारत सरकारने अनेक प्रयत्न सुरू केले आहेत. नेत्रदानाचे अभियान, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे, दृष्टिहीनांसाठी शिक्षण व रोजगारसंधी यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे. परंतु समाजाच्या मानसिकतेत बदल घडविणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे, आणि या क्षेत्रात दृष्टिहीनांसाठी संधीचे नवे दरवाजे उघडले आहेत. ब्रेल लिपी, स्क्रीन रीडर सॉफ्टवेअर, टॉकिंग बुक्स, ऑडिओ-लायब्ररीज, ॲप-बेस्ड नेव्हिगेशन सिस्टम्स यामुळे दृष्टिहीन व्यक्ती आता शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, संगणकशास्त्र, संगीत, कला, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत पुढे जात आहेत. भारतातील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर द एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ व्हिज्युअल डिसॅबिलिटीज (NIEPVD), देहरादून हे संस्थान दृष्टिहीनांसाठी प्रशिक्षण, संशोधन व मार्गदर्शन पुरविते. महाराष्ट्रात हेलन केलर इन्स्टिट्यूट फॉर ब्लाइंड, नाशिक ब्लाइंड स्कूल, पुण्यातील नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड अशा संस्था दृष्टिहीनांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक समावेशनासाठी कार्यरत आहेत.

'पांढरी काठी' ही अनेक देशांत कायद्याने मान्यता प्राप्त आहे. भारतात Rights of Persons with Disabilities Act, 2016 अंतर्गत दृष्टिहीन व्यक्तींना शिक्षण, रोजगार, वाहतूक, सार्वजनिक सुविधा आणि मतदानाचा समान अधिकार दिला आहे. सार्वजनिक ठिकाणी ब्रेल संकेत, साउंड सिग्नल्स, स्पर्शवाचक नकाशे, आणि सुरक्षित पादचारी मार्ग या सुविधा पुरविणे ही सरकारची जबाबदारी ठरविण्यात आली आहे. पांढरी काठी वापरणाऱ्या व्यक्तींचा सन्मान राखणे हे केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक कर्तव्य आहे. पादचारी किंवा वाहनचालकांनी रस्त्यावर पांढरी काठी पाहिली, तर त्यांनी थांबून त्या व्यक्तीला सुरक्षित मार्ग द्यावा, हा 'White Cane Safety' चा मूलभूत नियम आहे. समाजातील अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हे दृष्टिहीनांच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठे अडथळे आहेत. 'अंधत्व म्हणजे अपंगत्व नव्हे', हे जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. दृष्टिहीन व्यक्ती आपल्या संवेदना, बुध्दी आणि प्रतिभेच्या जोरावर समाजाचे महत्त्वाचे घटक ठरू शकतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले आहे. जगप्रसिद्ध पियानिस्ट रे चार्ल्स, गायिका स्टीव्ही वंडर, भारतातील डॉ. बेनजामिन दोरिसवामी किंवा दीपक महालांकर यांसारख्या व्यक्तींनी अंधत्वावर मात करून जीवनाचे नवे आदर्श निर्माण केले. हे सर्व दाखवून देतात की काठीचा रंग पांढरा असला तरी त्या मागचा आत्मविश्वास मात्र तेजस्वी आहे. जागतिक पांढरी काठी दिन (World White Cane Day) हा केवळ स्मरणदिन नाही; तो एक जागरूकता चळवळ आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करतात. जसे की दृष्टिहीनांसाठी वॉकाथॉन, पांढऱ्या काठीच्या रॅली, सार्वजनिक परिसंवाद, कार्यशाळा आणि प्रेरणादायी कार्यक्रम. याचा हेतू समाजाला सांगणे हा आहे की दृष्टिहीन व्यक्ती दया किंवा सहानुभूतीच्या नाही, तर सन्मानाच्या पात्र आहेत. शेवटी, पांढरी काठी ही अंधत्वाचे प्रतीक नाही, तर मानवी दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. ती अंधारातही आशेचा दिवा प्रज्वलित करते, निर्बंधांना आव्हान देते आणि प्रत्येक दृष्टिहीन व्यक्तीला स्वतःच्या सामर्थ्यावर चालण्याची प्रेरणा देते.जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात, प्रत्येक रस्त्यावर, प्रत्येक मनात जर आपण पांढऱ्या काठीला सन्मानाने वाव दिला, तर ते समाज म्हणून आपल्या प्रगल्भतेचे द्योतक ठरेल. जागतिक पांढरी काठी दिन हा आपल्याला शिकवतो की दृष्टी फक्त डोळ्यांत नसते; ती मनात, आत्म्यात आणि माणुसकीत असते. म्हणूनच या १५ ऑक्टोबरला, पांढऱ्या काठीचा सन्मान करा, दृष्टिहीनांच्या हक्कांचा आदर करा आणि समाजात 'दृष्टी' म्हणजेच 'संवेदना' हा खरा प्रकाश आहे, ही जाणीव पसरवा. **-डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान ९ वरून पुढे...

## केजमध्ये कोरडेवाडीच्या...

तहसील कार्यालयासमोर पेट्रोल टाकून बैलगाडी पेटविली. तर काही आंदोलनकांनी अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहणाचा प्रयत्न केला होता. त्यानंतर ११ ऑक्टोबर रोजी आंदोलक व गावकऱ्यांनी टोकवाडी रस्त्यावरील तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले. या दोन आंदोलनानंतर ही शासनाकडून मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने गावकरी आक्रमक बनले होते. मंगळवारी सकाळी ११.३० वाजता आक्रमक झालेल्या गावकऱ्यांनी मुलाबाळांसह केजला मोर्चा काढला. दुपारी १२.३० वाजता धारूर चौकातून मोर्चाला सुरुवात करीत पाणी आमच्या हक्काचं, देत कसं नाही, घेतल्याशिवाय राहत नाही, शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान व कर्जमाफी मिळाली पाहिजे.''' अशा घोषणा देत अहिल्यानगर - अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी पावणे एक वाजता रास्ता रोको आंदोलनास सुरुवात केली. आंदोलनकर्त्यांनी आपल्या भाषणातून खासदार, आम दारांसह सरकारवर टीकेची झोड उठवून तब्बल साडेचार तास रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनात बाळराजे आवरेंनी पेट्रोल अंगावर ओतून तर स्वप्नील वरपेंनी विषारी औषध प्राशन करीत आत्मदहनाचा प्रयत्न केला.

आंदोलन सुरू असताना अज्ञातांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या लातूर - पाटोदा (एम. एच. १४ एमएच १५५९), अहमदपूर - चाळीसगाव (एम. एच. १४ एमएच ६५२२), उदगीर - गंगापूर (एम. एच. १४ एमएच ८९३८), गंगाखेड - आळंदी (एम. एच. १४ बीटी ३९६४), (एम. एच. २० बीएल २१०८) या बसच्या समोरील काचावर दगडफेक करण्यात आल्याने बसचे नुकसान झाले आहे. तर बसमधील चालक, वाहकांसह पाच प्रवाशी जखमी झाले. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही बस या बसस्थानकात उभ्या केल्याने बसस्थानक बसने गच्च भरले होते.

◆ पान ९ वरून पुढे...

## केजमध्ये टपरी...

वातावरण निर्माण झाले होते. याचा व्हिडिओही सोशल मिडियावर व्हायरल झाला होता. या प्रकरणी दुपारपयरत केज पोलिसात गुन्हा दाखल झाला नव्हता. रणसिंग गोके याला केज पोलिसांनी ताब्यात घेतले.

## कापुस उत्पादक...

सिंधफणा नदीला आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे कापुस व ईतर पिकांचे मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या शेतकर्यांना ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. परंतु कापुस पिकाला बागायतीचा दर्जा दिला नसल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय झाला होता.अतिवृष्टी आणि महापूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बागायती वर्गवारीनुसार नुकसान भरपाई मिळावी यासाठी राज्याचे कृषिमंत्री, कृषी राज्यमंत्री सन्म ननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह संबंधितांकडे मागील आठवडाभरा आ. विजयसिंह पंडित यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. गेवराई विधानसभा मतदार संघासह संपूर्ण मराठवाडा विशेषतः बीड जिल्ह्यात खरीप हंगामात कापुस पिकाचे सार्वाधिक क्षेत्र आहे. एकावर्षी एकच कपाशीचे पिक त्यामुळे घेता येते. एकंदरीत बागायती वर्गवारी मधील सर्व निकष कापुस पिकाला लागु होतात. आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवुन त्यांना या सर्व विषयाची तपशिलाने माहिती देवुन कापुस पिकाचा बागायती पिकामध्ये समावेश करुन बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाईची रक्कम कापुस उत्पादक शेतकर्यांना देण्याची आग्रही मागणी केली. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांना यश आले असुन अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या शेतकर्यांना शासनाने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे.गेवराई विधानसभा मतदार संघासह

◆ पान ९ वरून पुढे...

संपूर्ण मराठवाडा विशेषतः बीड जिल्ह्यात खरीप हंगामात कापुस पिकाचे सार्वाधिक क्षेत्र असून या निर्णयामुळे कापुस उत्पादक शेतकऱ्यांना आ. विजयसिंह पंडित यांच्या सह मराठवाड्यातील आमदारांच्या प्रयत्नांमुळे नुकसान भरपाई मिळणार असल्यामुळे शेतकरी वर्गातुन समाधान व्यक्त केले जात आहे. सरकारने तात्काळ घेतलेल्या या निर्णयामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी सरकारचे आभार मानले आहेत. यावेळी आ. प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ. राजेश विटेकर आणि आ. संदीप क्षीरसागर उपस्थित होते.

## रमेश आडसकर...

आणण्याची ताकद ठेवणारे आज एका जिल्हा परिषद गटा साठी मोहतल झाले आहेत गेल्या काही वर्षांपासून पराभव त्यांचा पिछा सोडत नाही. ययुसुफवडगाव जिल्हा परिषद मध्ये त्याच्या पत्नी अर्चना आडसकर तर चिंचोली गटातुन त्याचे पुतणे ऋषिकेश आडसकर यांचा पराभव झाला होता, स्वःता रमेश आडसकर यांचा माजलगाव म तदारसंघातून दोनदा आमदारकीचा झालेला पराभव. गेल्या पंचवार्षिक म ध्ये ऋषिकेश आडसकर यांनी पंचायत समिती विजयी प्रवेश केला ऐवढच पण या पंचवार्षिक मध्ये ना जिल्हापरिषदेत गट राहीला न पंचायत समि तीत लढण्या साठी गण राहिला. त्यामुळे या जिल्हापरिषदे निवडणूकीत पुन्हा आपले पुतणे ऋषिकेश आडसकर यांना युसुफवडगाव सर्कल मधून लढण्यास उतरवतात का हे बघणे अवचित्याचे राहील जर असे झाले तर काँग्रेस कडून राहूल सोनवणे,शरद पवार गटाकडून सौरव सोनवणे व अजित पवार गटाकडून ऋषिकेश आडसकर अशी तिरंगी लढत होईल.

## शेतीच्या वादातून...

लोणी सय्यदमीर गावातून रविवारी पहाटे पुतणे रामदास देवकर,

◆ पान ९ वरून पुढे...

राहुल देवकर, संतोष देवकर यांच्यासह सून कविता देवकर, मनीषा देवकर, लता देवकर यांना ताब्यात घेतले आहे. मयत छबू देवकर यांच्यावर लोणी सय्यदमीर गावात पोलिस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले असून, या गुन्ह्याचा तपास सपोनि मंगेश साळवे करत आहेत.

## फरारी आरोपींना...

आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आष्टी श्री. हाणपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.सदर कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव,स.फौ. दत्तू उबाळे, पो.ह.क्र. १५३० तुषार गायकवाड, पो.शि.क्र. २२७९ सुनील बहिरवाळ आणि पो.शि.क्र. १२०५ गोविंद शेळके यांचा विशेष सहभाग आहे.पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी संबंधित पथकाचे कौतुक केले आहे.

## दु:खद घटना...

सकाळी आठ वाजता अंकुशनगर स्मशान भुमी मध्ये करण्यात आला,यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. पवन थिगळे वय ३८ वर्ष हे गेल्या दोन वर्षापासून आजारी होते १५ दिवसांपूर्वीच त्यांच्यावर मुंबई येथील खासगी रुग्णालयात किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया करण्यात आली होती,त्यांच्या पत्नीने स्वतःची किडनी देऊन त्यांना जीवदान दिले होते मात्र दि १३ रोजी सकाळी अचानक त्यांचे निधन झाले,त्यांच्या पश्चात आई,वडील,पत्नी,दोन मुलं,दोन भाऊ, भावजय,पुतण्या असा मोठा परिवार आहे,आज दि १४ रोजी अंकुश नगर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले, यावेळी नातेवाईकांसह शहरातील लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठीत नागरिक,मित्र परिवार उपस्थित होते,पोलीस खात्यातील पंकज थिगळे यांचे ते लहान बंधू होत.

◆ पान ४ वरून पुढे...

## श्री तुळजा भवानी...

पाकळी देण्याचा प्रयत्न करत आहोत. दिवाळी अगोदर सरकारकडून मदत जाहीर होणारच आहे. मात्र आज श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक वतीने आपल्या घरात मदत किट पोहचवल्या जात आहेत, याबद्दल देवस्थानच्या सर्व विश्वस्तांचे मी आभार मानतो असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले. श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या या मदतकार्यामुळे पूरग्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. संकट काळात समाजासाठी पुढे येणाऱ्या या उपक्रमाचे ग्राम स्थांनी समाधान व्यक्त करत कौतुक केले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल जाधव, उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, तालुका प्रमुख संतोष जाधव, उपशहरप्रमुख हनुमानप्रसाद पांडे तसेच आकाश जगताप, लक्ष्मीकांत दोडके, प्रतिक कांबळे आणि योगेश सारुक उपस्थित होते.

## ॲड. चंद्रकांत नवले...

मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब आणि मा.खा.डॉ.श्री. श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला तो विश्वास मी सार्थ करून दाखवेन असा संकल्प आणि शब्द ॲड. चंद्रकांत नवले यांनी बोलताना दिला आहे. यावेळी नियुक्तीपत्र देताना शिवसेना सचिव श्री. संजयजी मोरे, शिवसेना संपर्क नेते आमदार श्री. अर्जुनराव खोतकर, मराठवाडा संपर्क प्रमुख श्री. आनंदजी जाधव, शिवसेना सहसचिव श्री. एकनाथजी शेलार, आमदार दराडे साहेब यांचेसह आदी उपस्थित होते.

## ना. भुजबळ यांच्या ...

सांगितले आहे. शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश ससाने,

◆ पान ४ वरून पुढे...

वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला माजलगाव तालुक्यातून दहा हजारापेक्षा अधिक ओबीसी समाज बांधव उपस्थित राहणार असल्याचे समता परिषदेचे माजलगाव तालुका अध्यक्ष जगन खेत्रे, युवानेते संतोष रासवे यांनी सांगितले आहे.

## केजच्या कोरडेवाडी...

देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी उपोषणाच्या अकराव्या दिवशी सम स्त कोरडेवाडी गावकरी मंडळी समोर कॉल द्वारे सांगितलं होतं उपोषण स्थगित करा तुमची साठवण तलावाची मागणी मी लवकरच मान्य करत आहे पण आज त्याच गोष्टीला व त्यांच्या आश्वासनाला पूर्ण एक वर्ष झाला आहे तर त्याच अनुषंगाने आज कोरडेवाडी या गावात पुन्हा नव्याने कोरडेवाडी गावकऱ्यांच्या बळावर व धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष बाळराजे दादा वारे पाटील यांच्या माध्यमातून आज अकरा दिवस झालं राजश्रीताई उंबरे पाटील यांचा कोरडेवाडी या गावात आजचा उपोषणाचा अकरावा दिवस आहे आणि आज उपोषण ११ दिवस उलटूनही कोणताच प्रतिनिधी व प्रशासनाचा अधिकारी उपोषण स्थळे भेट देण्यात आलेला नाहीये . आत्ताच काही दिवसाखाली केज तालुक्यातील तहसील कार्यालय समोर बैलगाडी मोर्चा घेऊन तहसील कार्यालयासमोर बैलगाडी जाळण्यात आली होती तर त्यावेळेस आठ दिवसानंतर कुठे तहसीलदाराने उपोषण स्थळी भेट दिली व दोन दिवसा खाली कोरडेवाडी या ग्रामस्थांकडून आपल्या साठवण तलावाच्या प्रश्नासाठी जलसमाधी आंदोलन करण्यात आले होते कारण सरकारचं व प्रशासनाचे लक्ष कसं केंद्रित करावं यासाठी हे आंदोलन करण्यात आले होते तरी देखील सरकारला जाग आलेली नाहीये तर त्याच अनुषंगाने उद्या दिनांक १४ १० २०२५ रोजी केज तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे आणि जर का येत्या दोन दिवसांमध्ये या आंदोलनाची व उपोषणाची दखल घेण्यात नाही आली तर सरकारला हे शेतकऱ्याचे आंदोलन मोठे भोवनार. कारण सरकारला आम्ही त्यांच्या तिजोरीतील संपत्ती किंवा त्यांच्या जमिनी नाही मागत आहोत आम्ही आमच्या हक्काचं पाणी मागत आहोत व आम्ही आमच्या मागणीसाठी गेली ३०-३५ वर्ष झाले संघर्ष करत आहोत जर का दोन दिवसांमध्ये आमची दखल घेतली नाही तर या मराठवाड्यामध्ये

◆ पान ४ वरून पुढे...

शेतकरी काय करू शकतो हे नक्कीच मात्र सरकारला दाखवून देईल.असे मत सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे पाटील यांनी केले आहे.

## तपेनिमगाव परिसरातील...

दिवसांपासून छुप्या मार्गाने केनिच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा सुरू आहे,वाळू घाटाचा कोणताही लिलाव नसतांना हा उपसा सुरू असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.याकडे तहसील चे अधिकारी आणि कर्मचारी लक्ष देत नसल्याने हा अवैध वाळू उपसा छुप्या मार्गाने जोरात सुरू होता या कारवाई मध्ये दोन ट्रॅक्टर सह वाळू उपसा करणाऱ्या दोन केन्या जप्त करण्यात आल्या.याची नोंद पोलिस ठाण्यात करण्यात आली मुद्दे माल बारा लाखांचा जप्त करण्यात आला आहे.असून ट्रॅक्टर मालक,चालक आणि अवैध उपसा करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

## १ नोव्हेंबर या...

स्टेपल करुन सादर करावा. विवाहीत महिलांच्या नावात बदल असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा रात्रपत्र जोडणे आवश्यक आहे. सदरचे अर्ज हे मंडळ निहाय महसूल मंडळाचे मुख्यालयी मंडळ अधिकारी यांचेकडे सादर करता येतील अर्जदार हा नौकरदार असेल तर त्यांनी अर्जासोबत ३ री अनुसूची मधील विहीत नमून्यातील प्रमाणपत्र हे राजपत्रित अधिकारी यांचे स्वाक्षरीने जोडणे आवश्यक आहे. कार्यालय / शाळा कडून एकगठ्ठा पध्दतीने आलेले अर्ज हे सादर करताना उपरोक्त सर्व सुचना प्रमाणे तयार करुन एकत्र ०१ यादी तयार करुन ती सादर करावी. तसेच https://mahaelection.gov.in/Citizen/Login या प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे , ऑनलाईन पध्दतीने नमुना अर्ज १८ सादर करता येतील. या कार्यक्रम ानुसार दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पदवीधर नोंदणीसाठी नमुना अर्ज १८ भरण्याची अंतिम तारीख आहे, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत झालेल्या नोंदणीची दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द होणार आहे, प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीनंतर दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ ते १० डिसेंबर, २०२५ या कालावधी दावे व हरकती स्विकारण्यात येतील, दिनांक २५ डिसेंबर, २०२५ रोजी प्राप्त दावे व हरकती निकाली काढणे व पुरवणी यादी तयार करण्यात येईल व अंतिम मतदार यादीची प्रसिध्दी दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी होईल. करीता बीड जिल्ह्यातील दि.०१ नोव्हेंबर २०२२ पुर्वी पदवी उत्तीर्ण असणारे सर्व नागरिकांना ५ औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघासाठी नव्याने तयार

◆ पान ४ वरून पुढे...

करण्यात येणाऱ्या मतदार यादीमध्ये जास्तीत जास्त नोंदणी करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहाकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, बीड तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, औरंगाबाद पदवीधर मतदार संघ यांचे तर्फे करण्यात आले आहे.

## आदित्य एज्युकेशन...

सहभागी झाले. प्रमुख पाहुणे शाम पैठणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, सिव्हिल इंजनिअरिंग हे केवळ बांधकाम ापुरते मर्यादित नसून नव्या तंत्रज्ञानाशी समन्वय साधणारे विज्ञान आहे. योग्य कौशल्य आणि आत्मविश्वास असल्यास प्रत्येक विद्यार्थी उत्तम अभियंता बनू शकतो. त्यांनी आदित्य एज्युकेशन ग्रुपचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाचे आणि विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमात विद्यार्थिनी निकिता थोरात हिने मनोगत व्यक्त करताना सांगितले, या कार्यशाळेतून आम्हाला सिव्हिल इंजनिअरिंग क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान मिळाले. भविष्यातील करिअरसाठी हे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. दिपेश तावरे यांनी केले, तर आभार प्रा. रवी कांबळे यांनी मानले. या उपक्रमाच्या यशासाठी प्रा. गरकळ , प्रा. जाधव, प्रा. डोंगरे, प्रा. चावरे, प्रा. सोहेल मोमीन यांच्यासह संपूर्ण टीमने परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यशाळा प्राचार्य डॉ. निलेश बहादुरे, प्राचार्य डॉ. राहुल खडके, प्राचार्य डॉ. झिशान शेख आणि अॅकॅडमिक डीन प्रा. सय्यद दायमी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाली. आदित्य एज्युकेशन ग्रुपने आयोजित केलेली ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कौशल्यविकासासाठी एक प्रभावी पाऊल ठरली.

## जिल्हास्तरीय बीड...

शकतात त्यांचं नाव गुपित ठेवले जाते.आष्टी,माजलगाव,बीड या शहरांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आले त्याद्वारे मॉनिटर केले जात आहे शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन जनजागृती केली आहे सोशल मीडियाचे गुन्हे सायबर विभागाद्वारे सोडवले जातात असे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले तसेच दक्षता समिती मधील महिलांनी आयडेंटी कार्ड देण्यात यावे अशी मागणी केली. दक्षता समितीच्या महिलां सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, डॉ.प्राचार्या अरुंधती पाटील, यांच्यासह दक्षता समितीतील महिला पदाधिकारी, तसेच डॉक्टर, पत्रकार ,मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक शालिनी गजभारे यांनी केले व उपस्थितांचे आभार माने मॅडम यांनी मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाचे दोन महत्त्वाचे निर्णय...

# सिंचन विहिरी दुरुस्तीसाठी मदत, नापीक जमिनी मनरेगातून लागवडीयोग्य करता येणार

**• विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे तातडीने अंमलबजावणीचे निर्देश**

**छ. संभाजीनगर, । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने सन २०२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमुळे सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी आर्थिक सहाय्य मिळणार असून, पूरामुळे नापीक झालेल्या शेतजमिनी मनरेगा योजनेतून पुन्हा लागवडीयोग्य करण्यात येणार आहेत. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी या दोन्ही योजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश विभागातील जिल्हाधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य– खचलेल्या किंवा बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी शासनाने कमाल रु. ३०,०००/– इतकी मदत मंजूर केली आहे. प्रत्यक्ष दुरुस्तीचा खर्च किंवा ही कमाल मर्यादा – यांपैकी जी रक्कम कमी असेल, ती शेतकऱ्याला देण्यात येईल.

पात्रतेनुसार ज्या विहिरींचे पंचनामे झाले आहेत त्यांची दुरुस्ती या योजनेत अनुज्ञेय राहील. शेतकऱ्यांनी विहिरीची नोंद असलेला सातबारा जोडून गटविकास अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून अंदाजपत्रकीय खर्चाच्या ५० टक्के रक्कम (कमाल रु. १५,०००/–) आगाऊ स्वरूपात मिळेल. उर्वरित रक्कम काम पूर्ण झाल्यावर वितरीत करण्यात येईल. दुरुस्तीनंतर सर्व विहिरींचे जिओ टॅगिंग करणे अनिवार्य आहे.

नापीक जमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी मनरेगा योजनेचा वापर– पूरस्थितीमुळे खरडून नापीक झालेल्या लहान व सीमांत शेतकऱ्यांच्या (कमाल २ हेक्टर) शेतजमिनींची दुरुस्ती मनरेगा अंतर्गत केली जाणार आहे. जॉबकार्ड धारक शेतकरी या वैयक्तिक लाभाच्या कामांसाठी पात्र असतील.

प्रत्येक हेक्टरसाठी कमाल रु. ३ लाख, तर २ हेक्टरपर्यंत एकूण रु. ५ लाख इतकी मदत मिळेल. या कामांसाठी मजुरी व सामग्रीवरील खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ६०:४० असे राहील. ग्रामपंचायत कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून ही कामे पाहणार आहे.

शेतकऱ्यांना दिलासा – ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ– या दोन्ही निर्णयांमुळे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सिंचन विहिरींची दुरुस्ती आणि नापीक जमिनी पुन्हा तयार झाल्याने पुढील हंगामात शेतकऱ्यांना सिंचनाद्वारे पीक घेणे शक्य होईल. या योजनांची अंमलबजावणी वेळेत व काटेकोरपणे होणे अत्यावश्यक असून, त्यातून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास पुन्हा निर्माण होणार असल्याचे सह आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांनी सांगितले.

## सौं. सवाई यांना नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी देण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**



गेल्या ३० वर्षांपासून भाजप आणि नेतृत्वाने दिलेली प्रत्येक जबाबदारी, पक्षकार्य, शिबिर, आंदोलन मोर्चे, निवडणुकीतील प्रचार हे सर्व ताकदीने पूर्ण करणारा आणि नेत्यांचा शब्द अंतिम समजून आदेश मानणारा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून बीड जिल्ह्यात अजय सवाई हे परिचित आहेत. सत्ता असो अथवा नसो कसलीही अपेक्षा न करता निस्वार्थ भावनेने कार्य करणारा मुंडे साहेबांचा सच्चा मावळा आणि पंकजाताई आणि प्रितम ताई यांचा भाऊ म्हणून खंबीरपणे साथ देणारा कार्यकर्ता म्हणजे अजय सवाई अशी त्यांची ओळख आहे. विविध जाती धर्मातील बांधवांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सर्व सामान्य कुटुंबात जन्म घेतलेले अजय सवाई हे त्यांचे कडे काम घेऊन आलेल्या नागरिकाचे काम मार्गी लागावे यासाठी प्रामाणिकपने शेवटपर्यंत प्रयत्न करतात. सरकारी दवाखाना, तहसील कार्यालय, नगर परिषद आदी कार्यालयात सर्वसामान्यांची गोरगरिबांची कामे करण्यासाठी ते प्रामाणिकपने झटत असतात. अशा सर्वार्थाने योग्य असणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्ते अजय सवाई यांना नगर परिषद अध्यक्षपदासाठी पक्षाने उमेदवारी द्यावी असे आवाहन भाजप गेवराई तालुका सरचिटणीस बाळासाहेब परळकर यांनी केले आहे.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालय, बीड – उद्याचा रस्ता रोको आंदोलन स्थगित

**बीड । प्रतिनिधी**

राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय तसेच राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड, बीड येथील विद्यार्थिनींनी शाळेच्या परिसरातील निष्क्रिय डी. पी. त्वरित बसविण्याची मागणी केली होती. शाळा प्रशासनाने या संदर्भात संबंधित विभागाशी वारंवार पत्रव्यवहार केला होता. तथापि कार्यवाही न झाल्याने विद्यार्थिनींकडून दि. १५ ऑक्टोबर रोजी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.

या इशाऱ्यानंतर संबंधित एम.एस.ई.बी. कार्यालयाकडून तातडीने प्रतिसाद मिळाला असून, शाळेच्या परिसरात आवश्यक दुरुस्ती व नवीन डी.पी. इतरत्र बसविण्याबाबतचे पत्र शाळेला प्राप्त झाले आहे. त्यामुळे दि. १५ ऑक्टोबर रोजी नियोजित रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. श्री छत्रपती राजर्षी शाहू समाजप्रबोधन मंडळाचे अध्यक्ष इंजी. बलभीमराव जाहेर पाटील आणि संस्था सचिव प्रा. जे. पी. शेळके यांनी एम.एस. ई.बी. विभागाचे मनःपूर्वक आभार मानले असून, भविष्यात शाळेच्या सुरक्षेसंबंधी आवश्यक कामे नियमितपणे केली जातील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## उमेदच्या दिवाळी फराळ महोत्सवाचे बीडमध्ये उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत उमेदच्या वतीने गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी दिवाळी फराळ महोत्सव व विक्री प्रदर्शनाचे आयोजन दि.१४ ते १८ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा परिषदेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर बचतगटाच्या खाद्य पदार्थाची व वास्तूच्या या विक्री प्रदर्शनात मसाले, विणकाम, लाकडी वस्तु, खाद्य पदार्थ, आदी १३ स्टॉल उभारण्यात आले आहेत. बीड जिल्हा परिषदेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी या दिवाळी फराळ महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रकल्प संचालक श्रीमती सांगितादेवी पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, कार्यकारी अभियंता (बांधकाम नं.१) मोमीन, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता बीडकर, सहाय्यक लेखाधिकारी, उत्तम सातपुते, कट्टे, जोशी, यांचेसह अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## लाडेवडगावात ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्याला गर्दी

**• संत, कीर्तनकारांची उपस्थिती ; ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे कीर्तन**

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्यानिमित्त अखंड रामकृष्णहरी नामजप यज्ञ सोहळ्याची सांगता लाडेवडगाव येथील वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमावर मंगळवारी (दि. १४) झाली. यावेळी ज्ञानसिंधू ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले.या सोहळ्यास स्वामी भारतानंद गिरी, नामदेव महाराज शास्त्री, महादेव महाराज चाकरवाडीकर, लक्ष्मण महाराज मेंगडे, आदिनाथ महाराज, मनिषानंद स्वामी, सोपान महाराज



सानप, महारुद्र खाडे महाराज, प्रकाश महाराज साठे, नाना महाराज कदम, पांडुरंग महाराज मुंडे, डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री, आप्पा महाराज चौरे, अर्जुन महाराज लटपटे, पांडुरंग महाराज डोंगरेश्वर यांच्यासह राज्यभरातील वारकरी संप्रदायातील संत–महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील माजी मंत्री पंडितराव दौंड, नंदकिशोर मुंदडा, रमेश आडसकर, काशीराम कराड, भाई ज्ञानोबा मुंडे, बन्सी सिरसट, संतोष हांगे, विष्णू घुले, हिंदूलाल काकडे, नेताजी शिंदे, सूर्यभान मुंडे, पिंटू ठोंबरे, सौरभ सोनवणे, भगवान केदार, दत्ता धस, अयोध्याताई केंद्रे आदी मान्यवरही उपस्थित होते. यावेळी मान्यवरांसह अनेकांनी अर्जुन महाराज लाड यांचे अभिष्टचिंतन करत सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लाडेवडगाव व होळ ग्रामस्थांसह भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमाचे आजी–माजी विद्यार्थी आणि भाविकांनी परिश्रम घेतले.

## १७ ऑक्टोबर रोजी बीड येथे होणाऱ्या महाएल्गार सभेला शिवा संघटनेचा जाहीर पाठिंबा : प्रा. मनोहर धोंडे

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसींच्या न्याय हक्कासाठी बीड येथे ओबीसींचे संघर्ष योध्ये मा. ना. छगन भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये १७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महाएल्गार सभेला शिवा संघटनेचा जाहीर पाठिंबा आहे. बीड जिल्ह्यातील तमाम शिवा संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह मराठवाड्यातील शिवा संघटनेच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने या महाएल्गार मेळाव्यात सहभागी होऊन ओबीसींच्या एकजुटीची ताकद दाखवावी असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले आहे.शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी राज्यभर ठिक–ठिकाणी होणाऱ्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेवुन लढा उभारला आत आहे. त्याचाच भाग म्हणुन दि.०२ सप्टेबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने काढण्यात आलेल्या ओबीसीवर अन्याय करणारा शासन निर्णया विरोधात दि. ०८.०९.२०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयात शिवा संघटनेच्या वतीने पहीली याचिका दाखल केली आहे. एवढेच नाहीतर ज्या आझाद मैदानावर २ सप्टेंबरचा जी.आर देण्यात आला त्याच आझाद मैदानावर अन्याय करणारा जी आर रद्द करण्यासाठी शिवा संघटनेच्या वतीने दि. ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रचंड धरणे आंदोलन करण्यात आले. याच धरणे आंदोलनाच्या व्यासपीठावरून ओबीसीचे संघर्ष योध्दे व मंत्री ना. छगनराव भुजबळ यांनी पावसामुळे रद्द झालेल्या बीड येथील ओबीसीच्या महाएल्गार सभेची घोषणा केली. दि. १७ ऑक्टोबरला ही महाएल्गार सभा ओबीसी नेते मा. ना. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली घेण्याचे जाहीर केले आहे. या महाएल्गार सभेला शिवा संघटनेसह मराठवाडयातील संपूर्ण ओबीसी समाजाचा जाहीर पाठिंबा आहे.

तरी मराठवाडयातील शिवा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वीरशैव लिंगायत समाज बांधवासह संपूर्ण ओबीसी समाजबांधवानी शुक्रवार दि. १७ ऑक्टोवर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले आहे.

## बीडमध्ये भाजपाची ताकद दाखविणारी तयारी ; नगर परिषद निवडणुकीसाठी आज महत्वपूर्ण बैठक

**• बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांचे आवाहन**

**बीड । प्रतिनिधी**



आगामी बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक तयारीला गती दिली आहे. गुरुवारी दि. १६ ऑक्टोबर गुरुवार रोजी सकाळी १०.०० वाजता हॉटेल अन्विता हॉल, जालना रोड, बीड येथे पक्षाची महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस पशुसंवर्धन, पर्यावरण व हवामान बदल मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे, तसेच माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चा होणार आहे.

## बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेसचा स्वबळावर शक्तिप्रदर्शनाचा निर्धार : परवेज कुरेशी

**बीड । प्रतिनिधी**



आगामी बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसने सर्वच प्रभागांत स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष परवेज कुरेशी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. या निवडणुकीत काँग्रेस पक्ष नेत्या सोनिया गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राजीव गांधी, खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, आदित्य पाटील, तसेच जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण ताकदीने उतरणार आहे.

सत्ताधाऱ्यांनी ३५ वर्षे बीड नगरपालिका लुटली आहे. एका पावसातच त्यांच्या विकासाच्या दाव्यांची पोलखोल झाली आहे. भ्रष्टाचाराचा डोंगर उभा राहिला आहे. आता त्यांना घरी बसण्याची वेळ आली आहे, असे कुरेशी यांनी स्पष्ट केले. काँग्रेसने जनतेच्या हितासाठी, विकासाच्या मुद्द्यांवर आणि अधिकारशाही संपवण्यासाठी निवडणूक पूर्ण ताकदीने लढण्याचा निर्धार केला आहे. नगराध्यक्षपदासह सर्व प्रभागांत काँग्रेस उमेदवार उभे केले जाणार आहेत. लवकरच बीड शहरात पक्षश्रेष्ठींच्या उपस्थितीत एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात येणार असून, या बैठकीत पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेऊन अनेक निर्णायक पावले उचलली जाणार आहेत

## आदित्य एज्युकेशन ग्रुपमध्ये अल्ट्राटेक स्किल होनिंग कार्यशाळा उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या सिव्हिल इंजनिअरिंग विभागात अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या ड्ड्ळश्र्र केम्रळपस लरवशृ (णडक) तर्फे आयोजित कौशल्यविकास कार्यशाळा अत्यंत उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत उपयुक्त प्रात्यक्षिकांसह १४५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करण्यात आले. विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वृद्धिंगत करून त्यांना पदवी पश्चात येणाऱ्या औद्योगिक आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्यास तयार करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

## लहुजी शक्ती सेनेची गेवराई तालुका कार्यकारणी जाहीर बाळासाहेब साबळे यांची गेवराई तालुका अध्यक्ष पदी निवड

**तलवाडा । प्रतिनिधी**



लहुजी शक्ती सेनेची नुसतीच बैठक पार पडली यामध्ये गेवराई तालुक्याची कार्यकारणी जाहीर करून गेवराई तालुका अध्यक्षपदी केकत पांगरी गावचे धडाडीचे कार्यकर्ते संपादक बाळासाहेब साबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या बैठकीसाठी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, व लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून बैठकीचा प्रारंभ करण्यात आला.वर्गवारी आरक्षणासाठी लहुजी शक्ती सेनेच्या माध्यमातून सातत्याने आंदोलन उपोषण व न्यायालयीन मार्गाने लढा यशस्वी झाला आहे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अ ,ब क,ड प्रमाणे वर्गवारीची अमलबजावणी होण्याच्या मागणीसाठी संघटना प्रयत्नशील आहे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे व प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल सुरू असल्याचे बैठकीत स्पष्ट करून उपस्थित प्रमुख वक्त्यांनी आपल्या हक्काच्या मागणीसाठी रस्त्यांवर उतरण्याचा इशारा दिला.

बाळासाहेब साबळे सारख्या तरुणाने गेल्या अनेक वर्षापासून संघटना चळवळीत प्रामाणिकपणे आणि इमानदारीने काम केले आहे या कामाची पावती म्हणून समाज बांधवांनी त्यांच्यावर विश्वासाची धुरा समर्थपणे दिलेली असल्याचे अनेक वेळा अनुभवायला मिळाले. चळवळीतल्या त्याच्या कार्यकर्त्याला अखेर विष्णू भाऊ कसबे यांनी न्याय दिल्यामुळे गेवराई तालुक्यात आनंदमय वातावरण निर्माण झाले आहे. संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांच्या गेवराई तालुक्यात धडाकेबाज एन्ट्रीने अनेकांच्या भवया उंचावल्या आहेत तसेच लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे साहेब व तसेच कैलास दादा खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुका अध्यक्षपदी नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली असून त्यांना पुढील राजकीय कार्यास लहुजी शक्ती सेनेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. पुढे बोलताना नवनिर्वाचित तालुकाप्रमुख म्हणाले की लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे साहेब हे या देशांमध्ये समाजासाठी अहोरात्र चळवळीचे काम करत आहेत क्रांती गुरु लहुजी साळवे अण्णाभाऊ साठे –फुले –शाहू आंबेडकर सर्वसामान्य पर्यंत विचार रुजवण्याचे काम लहुजी शक्ती सेना करत आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. संपादक बाळासाहेब साबळे यांच्या निवडी बद्दल त्यांना दैनिक मराठवाडा पत्र परिवाराच्या वतीने शुभेच्छा.


### जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**

e-mail -tahsildar georai2@gmail.com

दिनांक १४.१०.२०२५

दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–

प्रती,

१ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई

२. ग्राम महसूल अधीकारी गेवराई

विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८१)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार जिजाबाई पुन्ना राठोड, रा. पाचेगाव / जयराम तांडा ता गेवराई जि बीड यांचा जन्म दिनांक २८/ ०७/१९७३

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०१ अर्जदार जिजाबाई पुन्ना राठोड रा. पाचेगाव / जयराम तांडा ता गेवराई जि बीड यांचा जन्म दिनांक २८/ ०७/१९७३ रोजी पाचेगाव ता गेवराई जि बीड येथे झालेला आहे तरी याबाबत कोणाला आक्षेप असेल तर पंधरा दिवसाच्या या आत कळवा.

संदर्भ क्र ०१ चे शासन निर्णय दिनांक १२.०३.२०२५ मध्ये जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२६/ ईऑ९ ९१ १८१)/प्र.क्र. २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो. स्टें गेवराई/ पाचेगाव / जयराम तांडा यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी राहेरी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का

(स्वाक्षरीत)
तालुका दंडाधिकारी, गेवराई



### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १४३३/ २०२५

गणेश वि. निरंक

ज्याअर्थी– राजाभाऊ गणपती तोडेकर, हे दिनांक ०३.०७.२०२५ रोजी मौजे च–हाटा, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी

१. गणेश पि. राजाभाउ तोडेकर, वय ४० वर्षे, धंदा– शेती, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि. बीड, २. रमेश पि. राजाभाउ तोडेकर, वय–३६ वर्षे, धंदा– शेती, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि. बीड, ३. सुरेश पि. राजाभाऊ तोडेकर, वय ३५ वर्षे, धंदा नौकरी, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि. बीड, ४. विजयकला पि. राजाभाऊ तोडेकर, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि.बीड, ५. पंचफुला भ्र. विक्रम घाडगे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाकनाथपूर, बीड ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले आहे. तसेच अर्जदार क्र. ४ या मयताच्या पत्नी असून अर्जदार क्र. ५ ही विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना / अर्जदाराला सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २७.१०.२०२५ ही आहे.

आज दिनांक १४.१०. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(ॲड. उबाळे एस.एस. यांचे मार्फत)

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार, दि. १५ ऑक्टोबर २०२५ • पान ४

# श्री तुळजा भवानी मंदिर देवस्थानच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना ४०० मदत किटचे वाटप

## देवस्थानच्या विश्वस्त मंडळाचे मनःपूर्वक आभार: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या भीषण पूरस्थितीत शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या कठीण प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नियोजनाखाली श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक यांच्या वतीने पूरग्रस्तांना दिलासा देण्यात आला. काल दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता सिंदफणा नदीकाठी वसलेल्या तांदळवाडी व आहेर चिंचोली या गावांमध्ये देवस्थानाकडून पूरग्रस्त नागरिकांना ४०० किराणा मदत किटचे वाटप करण्यात असून म दतकार्य देवस्थानाचे विश्वस्त मंडळ अध्यक्ष माजी आमदार ॲड. शिवाजी सहाणे, सचिव सुभाष पाटोळे, सदस्य राजेंद्र गायकवाड, रवींद्र गायकवाड, प्रमोद लोणकर, बाळासाहेब चव्हाण, दिलीप कदम, अरुण गायकवाड व महेश पाटोळे यांच्या उपस्थितीमध्ये




पार पडले. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात आणि डोळ्यात पाणी

### ● निदान दोन दिवसाची का होईना चूल पेटावी: ॲड. शिवाजी सहाणे

**श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना छोटीशी मदत म्हणून निदान दोन दिवसाची का होईना चूल पेटावी या भावनेने किराणा मदत किटचे वाटप करत आहोत. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी गावोगावी गरजवंत शेतकऱ्यांची यादी बनवून सर्वांना कसा लाभ मिळवून देता येईल यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या मदतीमुळेच आम्ही आज आपणा पर्यंत पोहचू शकलो, असे मत माजी आमदार तथा श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शिवाजी सहाणे यांनी व्यक्त केले.**

असताना आम्ही फुल नाही फुलाची ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### १ नोव्हेंबर या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्यासाठी राजकीय पक्षासोबत बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ (मंगळवार) रोजीपासून पदवीधर मतदार नोंदणी सुरु आहे. भारत निवडणूक आयोगाने ५ औरंगाबाद पदवीधर मतदार संघाच्या दि. ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणे बाबतचा कार्यक्रम घोषीत केलेला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदनिर्देशीत अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय कार्यालय, सर्व तहसिल कार्यालयामध्ये मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांचेसमवेत दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये दि. ०१ नोव्हेंबर २०२२ पुर्वी उत्तीर्ण झालेल्या नागरीकांनी पदवीधर मतदार यादी नव्याने तयार होणाऱ्या मतदार यादीमध्ये नोंदणीसाठी नमुना अर्ज १८ भरून नोंदणी करणे अनिवार्य असल्याची माहिती देण्यात आली. मतदार नोंदणी करण्यासाठी पुढील कार्यपध्दीती वापरावी. नमुना अर्ज क्र. १८ ( संपुर्ण निळ्या किंवा काळया शाईने मराठी किंवा इंग्रजी मध्ये भरलेला. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाचे पदवी प्रमाणपत्र किंवा पदवीच्या अंतीम वर्षाची मार्कशीट ची झेरॉक्स प्रत.पासपोर्ट साईज फोटो (०१ अर्जावर नमूद ठिकाणी चिटकलेला, व ०१ अर्जासोबत स्टेपल करुन द्यावा.मतदान ओळखपत्र किंवा आधार कार्ड यापैकी एक अर्जासोबत सर्व कागदपत्र ही स्व-साक्षांकित करावीत व ०१ फोटो हा अर्जावर चिकटवावा (स्टेपल करु नये) व ०१ फोटो अर्जासोबत पारदर्शक कॅरीबॅग मध्ये ▶ उर्वरित पान २ वर

### आदित्य एज्युकेशन ग्रुपमध्ये अल्ट्राटेक स्किल होनिंग कार्यशाळा उत्साहात

#### कौशल्यविकासासाठी उपयुक्त प्रात्यक्षिकांसह १४५ विद्यार्थांना मार्गदर्शन



**बीड । प्रतिनिधी**

आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या सिव्हिल इंजनिअरिंग विभागात अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या डज्ञळश्रश्र केपळपस लरवशा (णडक) तर्फे आयोजित कौशल्यविकास कार्यशाळा अत्यंत उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत उपयुक्त प्रात्यक्षिकांसह १४५ विद्यार्थांना मार्गदर्शनही करण्यात आले. विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वृद्धिंगत करून त्यांना पदवी पश्चात येणाऱ्या औद्योगिक आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्यास तयार करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन शाम पैठणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत, प्राचार्य डॉ. निलेश भास्कर बहादुरे, प्रा. सय्यद दायमी, प्रा. रवी कांबळे आणि प्रा. शरद कावळे यांच्या हस्ते करण्यात आले. कौशल्यविकास या विषयावर भर देत विद्यार्थ्यांना सिव्हिल इंजनिअरिंग क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाची माहिती, कामातील व्यावहारिक अडचणी आणि त्यावरील उपाय यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या कार्यशाळेत एकूण १४५ विद्यार्थी ▶ उर्वरित पान २ वर

### जिल्हास्तरीय बीड महिला दक्षता समितीची बैठक संपन्न



**वडवणी । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन मधील महिला दक्षता समितीची बैठक पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे संपन्न झाली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक म्हणून पोलीस उपअधीक्षक उमाशंकर कस्तुरे तसाच भरोसा सेल प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव,श्रीमती आशा धनवडे बालसुधारगृह उपस्थित होत्या. महिला दक्षता समितीतील सर्व पदाधिकारी व पोलीस आपण पीडित मुलींना महिलांना मदत करतो तसेच प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये क्यूआर कोड द्वारे पीडित मुली महिला आपली तक्रार देऊ ▶ उर्वरित पान २ वर

# ॲड. चंद्रकांत नवले यांची शिवसेना जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना नेते मा. खा. डॉ. श्री. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. चंद्रकांत नवले यांची गेवराई कार्यक्षेत्रासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. ॲड.चंद्रकांत नवले हे मूळचे शिवसैनिक असून त्यांना पक्ष संघटनेचा मोठा अनुभव आहे. त्यांनी हिंदुत्वाचा विचार आणि हिंदूहृदय सम्राट स्व.



बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी सिव्हिल इंजीनियर पदाचा राजीनामा देऊन महाविद्यालयीन सवंगड्यांना सोबत घेऊन स्वतः सामना या वृत्तपत्राचे शहरात तसेच खेड्यापाड्यापर्यंत वाटप केले तद्नंतर माजी मंत्री प्रा. सुरेश (आण्णा) नवले यांच्या कुशल अशा मार्गदर्शनाखाली त्यांनी १९९५-१९९९ कार्यकाळात शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून काम करताना शिवसेना पक्ष फक्त शहरापुरता मर्यादित न ठेवता बीड जिल्ह्यातील प्रत्येक गाव, वाडी, तांडा, वस्ती व पाड्यापर्यंत पोहोचून व शिवसेनेच्या शाखा स्थापन करून आणि संघटनेतील सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन शिवसेना पक्षाची जिल्हाभर ताकद निर्माण केली होती. या आणि अशा सर्व बाबींचा विचार करून शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ▶ उर्वरित पान २ र

### ना. भुजबळ यांच्या उपस्थितीत होणाऱ्या ओबीसी महाएल्गार सभेस माजलगाव तालुक्यातील हजारो ओबीसी जाणार : खेत्रे, संतोष रासवे

#### ● माजलगाव तालुक्यातील गाव, तांड्यावरील ओबीसी एकवटणार!

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेच्या अनुषंगाने समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव तालुक्यातील प्रत्येक



गाव, तांड्यावर बैठका घेण्यात आल्या आहेत. माजलगाव तालुक्यातील दहा हजारापेक्षा अधिक ओबीसी समाज बांधव सभेला जाणार असल्याचे समता परिषदेचे माजलगाव तालुकाध्यक्ष जगन खेत्रे, युवा नेते संतोष रासवे यांनी ▶ उर्वरित पान २ वर

### केजच्या कोरडेवाडी गावचा साठवण तलावासाठी 30 ते 35 वर्षांपासूनचा संघर्ष : स्वप्निल वरपे

## प्रशासन कोरडेवाडी गावच्या ग्रामस्थांना न्याय देणार आहेत का?

**बीड । प्रतिनिधी**

कोरडेवाडी या गावचा गेली ३० ते ३५ वर्षापासून साठवण तलावासाठी संघर्ष चालू आहे. केज तालुक्यातील शासन प्रशासन इथली संत्री मंत्री खासदार आम दार पुढारी आणि एक वर्षांपूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी देखील गावकऱ्यांना कॉल द्वारे आश्वासन दिले होते तरी देखील आतापर्यंत आश्वासन दिली पण पूर्ण कोणीच केले नाही.

कोरडेवाडी हे गाव गेले ३०-३५ वर्ष झाले कोरडेवाडी साठवण तलावाच्या मागणीसाठी लढत आहे आत्तापर्यंत या तालुक्याचे जिल्ह्याचे शासन प्रशासन अधिकारी प्रतिनिधी पुढारी संत्री मंत्री आमदार खासदार यांनी फक्त या गाववाल्यांना आश्वासन दिली पण पूर्ण काम कोणीच केले नाही आज गेली ३०-३५ वर्ष झालं हे गाव साठवण तलावासाठी संघर्ष करत आहे कारण या गावांमध्ये पाणी नाही म्हणुन इथले ग्रामस्थ आत्महत्या करण्यापर्यंत गेले आहेत. कारण या गावांमध्ये कुठल्या प्रकारचं प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींच्या पुढार्यांच्या आश्वासनाला बळी पडून वैतागून गेली आहेत कारण या गावांमध्ये फक्त पाणी नाही म्हणून इथला २० एक्कर असणारा शेतकरी विदर्भात जाऊन दीड एकर शेती असणाऱ्या पाशी आपलं पोट भागवण्यासाठी ऊस तोडत आहे. पाण्या वाचून या गावातील मुलांचे लग्न होईना झालेत पाणी नाही म्हणून ह्या शेतीला भाव नाहीये आणि नाईलाजाने या गावातील मुलं आपलं पोट भागवण्यासाठी बाहेर जिल्ह्यात जाऊन काम करत आहेत. आणि या गावचा शेतकरी ऊस तोडून कर्ज काढून आपल्या मुलाला बाहेर जिल्ह्यात शिकायला पाठवत आहे. या सगळ्याला कारण फक्त एकच आहे कोरडेवाडीचा साठवण तलाव गेल्या वर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून राजश्रीताई उंबरे पाटील यांनी कोरडेवाडी या गावात साठवण तलावाच्या प्रश्नासाठी अकरा दिवस बिन अन्न पाण्याचं आमरण उपोषण केलं होतं त्यावेळीस देखील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ▶ उर्वरित पान २ वर

### तपेनिमगाव परिसरातील अवैध वाळू उपशावर तलवाडा पोलिसांची कारवाई

#### दोन केन्या सह दोन ट्रॅक्टर जप्त: बारा लाखाचा मुद्देमाल जप्त



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील तपेनिमगाव परिसरात छुप्या मार्गाने केनिच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा होत असल्याची गुपनिय माहिती तलवाडा पोलिसांना मिळताच त्यांनी या अवैध वाळू उपश्यावर दिं.१३ ऑक्टोबर रोजी धाड टाकली यामध्ये दोन ट्रॅक्टर सह वाळू उपसा करणाऱ्या दोन केन्या असा जवळपास आठ ते दहा लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक स्वापनिल कोळी,पोह हनुमान जावळे,पोह कैशव गोरे,पोह विशाल वडमरे,पोह,वाहक सुग्रीव रुपणर, यांनी कामगिरी केली असून याप्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील तपेनिमगाव परिसरात मागील अनेक

▶ उर्वरित पान २ वर

# पूरस्थितीत सभापती रामेश्वर गोरे ठरले खरे संकटमोचक!

## आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्तांना सुरक्षित स्थळी हलवून अन्न, निवारा व शासकीय मदत मिळवून दिली

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरात काही दिवसां पूर्वी पडलेल्या मुसळधार पावसाम ुळे अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली. या भीषण परिस्थितीत पाटोदा नगरपंचायतचे सभापती रामेश्वर गोरे यांनी लोकांच्या मदतीसाठी पुढाकार घेत खऱ्या अर्थाने संकट मोचकाची भूमिका बजावली. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली



कार्यरत राहून सभापती गोरे यांनी पूरग्रस्त नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याचे जबाबदारीचे काम अत्यंत तत्परतेने पार पाडले. तर पूरग्रस्त नागरिकांसाठी अन्न,निवारा,आणि शासकीय साहाय्य मिळवून देण्यासाठी त्यांनी धावपळ केली.गोरे यांनी नगरपंचायतच्या यंत्रणेला सतत सज्ज ठेवत मदत पोहोचविण्याचे काम केले. पूरग्रस्त भागातील नागरिकांना धीर देत, त्यांच्या अडचणी ऐकून घेत प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवत उपाययोजना केल्या. नागरिकांची अडचण दूर होईपर्यंत त्यांनी स्वतः घटनास्थळी राहून देखरेख केली.गावातील वयोवृद्ध, महिला, लहान मुलांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर, अन्नधान्य वितरण, तात्पुरते निवारा केंद्र उभारणे, तसेच नागरिकांना शासकीय मदत मिळवून देणे या सर्व आघाड्यांवर सभापती गोरे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या कार्यामुळे पाटोदा शहरातील अनेक नागरिकांना दिलासा मिळाला. जनतेच्या सुखदुःखात नेहमी धावून जाणारे आणि लोकांसाठी नेहमी उपलब्ध राहणारे सभापती रामेश्वर गोरे हे आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वातील शिस्तबद्ध आणि जनसेवेप्रती निष्ठावान कार्यकर्त्यांचे प्रतीक ठरले आहेत.